

पिंपळे सौदागर येथे 'हॉटेल रंगला पंजाब' खालील मजल्यावर आग

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 02/12/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 5 ‖ अंक 284 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com

# 'मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार सोहळा

## ०७ डिसेंबर रोजी होणार पुरस्कार प्रदान सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड -पिंपरी चिंचवड शहरातील शबनम न्यूज वृत्तसंस्थेच्या दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत या वृत्तपत्राच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मानाचे समजले जाणारे 'मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड २०२५' पुरस्कार समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्कार सोहळा येत्या ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात संपन्न होत आहे. सदर पुरस्कार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी ताई खडसे व मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.**




तसेच या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित म्हणून शिवसेना उपनते इरफान भाई सय्यद, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. उपमहापौर शैलजाताई मोरे, माजी नगरसेविका प्रियांका ताई बारसे, पिंपरी चिंचवड शहर शिवसेना संघटिका सरिताताई साने, पिंपरी चिंचवड शहरातील प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे व सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शहरातील सामाजिक, सांस्कृतिक, कला, शिक्षण, आरोग्य, उद्योग, उद्योजकता, क्रीडा आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड ही एक महत्त्वाची व्यासपीठ बनली आहे. यंदाही या पुरस्कार सोहळ्याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता असून अनेक मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे.शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने दरवर्षी मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो. आपल्या कार्यातून समाजात ठसा उमटविणारे तसेच आपल्या मेहनतीने उंची गाठणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान केला जातो. पिंपरी चिंचवड शहरात शबनम न्यूज मीडिया ग्रुप वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून समाजातील कौतुकास्पद कामे करणाऱ्या व्यक्तींना कर्तुत्वाची थाप देण्याकरिता हा पुरस्कार देण्यात येतो. दैनिक मेट्रो सिटी वृत्तांतच्या वर्धापन दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. याही वर्षी सदर पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला असून, यामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील सक्षम नेतृत्व असणारे निखिल उमाकांत दळवी, महिला सक्षमीकरणासाठी नेहमी आग्रही असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सीताताई राम केंद्रे, सामाजिक कार्याचा वसा जपणारे लक्ष्मण सर्जेराव शिंदे, सामाजिक कार्याचा ध्यास असणाऱ्या सीमा शांतादेवी जयसिंगराव चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते विनोद सत्यशीला शंकरराव वरखडे, सर्वसामान्यांच्या हाकेला साथ देणारे रमजान सय्यद, विकासाचे व्हिजन व दूरदृष्टी असणारे नेते शिरीष संभाजीराव साठे, संघर्षातून घडलेला युवक अभिजीत तानाजी कदम, आदर्श कामगार किरण दिनकर बागल, थेरगाव चे सुपुत्र अनिकेत परशुराम प्रभू, यशस्वी उद्योजक संजय जगताप व जनसेवेचा वाढता आलेख असलेले व्यक्तिमत्व मारुती जाधव, पिंपरीतील सक्षम नेतृत्व सुरेश लोंढे, कायदेतज्ञ ॲड विशाल जाधव, समाजात महिला नेतृत्व म्हणून नावारूपास येत असलेल्या आस्मा इम्रान शेख, जैन समाजातून उदयोन्मुख व्यक्तिमत्व संदेश गादीया, प्रदीर्घ सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या अश्विनी नामदेव शिंदे, ए.के.ढवळे नेओबिल्ड कंपनीचे संचालक आबा ढवळे या व्यक्तींचा यंदाचा मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड २०२५ जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कार सोहळ्यात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान देखील करण्यात येणार आहे. त्यासोबतच ज्येष्ठ नागरिकांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे. तसेच शहरातील प्रामाणिकपणे उत्तम प्रकारे कार्य करणाऱ्या महिला बचत गटांचा देखील सन्मान यावेळी होणार आहे.

तरी या कार्यक्रमात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन शबनम न्यूज वृत्तसंस्थेच्या संपादिका शबनम सय्यद यांनी केले आहे.

# भव्य गडकिल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**माजी नगरसेवक राहुल कलाटे यांच्या संकल्पनेतून आयोजित 'दीपोत्सव विशेष गडकिल्ले बांधणी स्पर्धे'चा बक्षीस वितरण सोहळा शनिवारी (ता. २९) वाकड येथे अत्यंत दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करणाऱ्या बालगोपाळांनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला होता.**



सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरला तो 'जय जय शंकर' फेम बालकलाकार आरुष बेडेकर. ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वास मोरे, उद्योजक सुमित बाबर, किरण वडगामा, प्रशांत विनोदे, संतोष कलाटे, अजय कलाटे, निखिल कलाटे, बाळकृष्ण कलाटे, अक्षय जमदाडे, गिरीश शेडगे, तेजस माझिरे, शिवाजी कटके, युवराज सायकर, दिनेश वाजे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रगीताने सुरुवात झाली. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते चषक, प्रमाणपत्र आणि आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्वांना प्रोत्साहनपर भेटवस्तू देण्यात आल्या.

आमच्या इतिहासातील गडकिल्ले हे केवळ दगड-मातीचे नाहीत, तर स्वराज्याची स्वप्ने आणि बलिदानाचे प्रतीक आहेत. ही स्पर्धा मुलांमध्ये इतिहासाबद्दल कुतूहल निर्माण करेल आणि शिवचरित्राची गोडी निर्माण करेल, महाराजांच्या किल्ल्यांचा इतिहास आणि त्यांचे सामरिक महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजक राहुल कलाटे यांनी सांगितले.

यावेळी सहभागी स्पर्धकांनी मनोगत केले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पुढील वर्षी ही स्पर्धा आणखी मोठ्या स्तरावर घेण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

**स्पर्धेतील विजेते**

सोसायटी ग्रुप :- प्रथम: पलाश सोसायटी, द्वितीय: बाबाजी पांडू भांडे कुस्ती संकुल, तृतीय:स्कायलाईन सोयायटी वाकड, उत्तेजनार्थ: रॉयल मॅजेस्टिक सोसायटी, शिवशंभू बाईज, केतन पॅराडाईज सोसायटी, वैयत्तिक : प्रथम : यश थेडे, श्री रामबाडे, दुतिय: समर्थ दळवी, तृतीय: अर्णव गोते, उत्तेजनार्थ: सुषमा ढवळे, अनिरुद्ध शेंडकर, पायल पवार, आदित्य नखाते, सानवी सोरटे, शौर्या कुलकर्णी, श्लोक कोते.

# विश्वबंधुतेचा पत्रकारिता पुरस्कार गजाला सय्यद यांना प्रदान!

## विश्वबंधुता परिषदेच्या वतीने "आम्ही सावित्रीच्या मायलेकी" संमेलनात पुरस्कार सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील शबनम न्यूज वृत्तसंस्थेच्या युवा पत्रकार गजाला सय्यद यांना 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या हस्ते देण्यात आले.**



विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त आयोजित 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' महाकाव्य संमेलन संपन्न झाले. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना गजाला सय्यद म्हणाल्या, "अगदी लहानापासून पत्रकारिते क्षेत्रात मी कार्यरत आहे. आज या कार्याची पोचपावती मला मिळालेली आहे. आई वडिलांचे सहकार्य नेहमी लाभले त्यामुळे इथ पर्यंत पोहचले. आई-वडिलांसोबत नेहमी शिक्षकांनी सहकार्य केले. माझ्या या यशाचे श्रेय मी माझे आई-वडिलांना देते! तसेच विश्वबंधुता परिषदेने माझ्यावर दाखविला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करेल."संमेलनात 'क्रांतीसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' बंधुता चळवळीत गेल्या ५१ वर्षांपासून योगदान देणाऱ्या मंदाकिनी आणि बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांना, तर 'ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले ज्ञानसाधना पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील कन्या महाविद्यालयास, तसेच 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' नम्रता फडणीस (लोकमत), सुवर्णा चव्हाण (पुढारी), कल्पना खरे-साठे (केसरी), मेधा पालकर (सामना), प्रीती पाठक (भास्कर), अर्चना मोरे (पुणे मिरर), चैत्राली देशमुख (सिव्हिक मिरर), शिवानी पांढरे (एबीपी माझा), गजाला सय्यद (शबनम न्यूज), वनिता चौधरी (साहित्यलीला पंढरी) यांना प्रदान करण्यात आला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने प्रा. सुप्रिया बनकर, प्रा. अनुप्रिया प्रभू, प्रा. सीमा ठोंगिरे, प्रा. पूजा जाधव, डॉ. माधुरी देशमुख, डॉ. मोनिका जैन, रोहिणी काकडे, सुषमा कारंडे, डॉ. वैशाली सुपेकर, प्रा. गौरी माळी, प्रा. सुवर्णा यादव व प्रा. पूजा चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 02/12/२०२5
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# राज्यातील शाळा 5 डिसेंबरला बंद!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार याचिका दाखल करावी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमित वेतनश्रेणी लागू करावी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया तत्काळ सुरू करावी...**



अशा विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर समन्वय संघटनेच्या वतीने राज्यातील सर्व शाळा शुक्रवारी (५ डिसेंबर) रोजी बंद ठेवण्यात येणार आहेत. समितीच्या वतीने राज्यात सर्वत्र जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढून निवेदन देण्यात येणार आहे.पुण्यातील मोर्चाचे नेतृत्व शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीचे समन्वयक शिवाजी खांडेकर करणार आहेत. समितीच्या वतीने सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. सुनील जगताप, नंदकुमार सागर, सचिन डिंबळे, के. एस. डोमसे, संग्राम कोंडे-देशमुख या वेळी उपस्थित होते.त्यामुळे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, मुख्याध्यापक, संस्थाचालक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध संघटनांचा समावेश असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीच्या बैठकीत ५ डिसेंबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुण्यातील मोर्चा नवीन जिल्हा परिषदेपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढला जाणार असून जिल्ह्यातील आठ ते दहा हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होतील.'

# वाहनचोरी करणारी टोळी अटकेत!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या परिमंडळ एक मधील वाहन चोरी विरोधी विशेष पथकाने वाहनचोरी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे. १५ लाख रुपये किंमतीच्या ३७ दुचाकी आणि दोन ऑटो रिक्षा जप्त करण्यात आल्या.**




मुबीन नुरमुहम्मद शेख (वय २५, रा. पिंपळेगुरव), फैज फिरोज शेख (वय २२, रा. धुळे), अमन प्रेमचंद्र शुक्ला (वय १९, रा. संत तुकारामनगर, पिंपरी), सुनील शांताराम मोरे (वय ३०, रा. उरळी कांचन) आणि राजू शंकर मराठे (वय ४६, रा. देहूरोड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. यात दोन अल्पवयीन मुलांचाही सहभाग उघड झाला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो स्थानक आणि गर्दीच्या भागात वाढणाऱ्या वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार यांनी विशेष पथक तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक दिगंबर अतिग्रे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले.पथकाने चोरीच्या घटनांमधील १०० ते १५० 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले. तांत्रिक तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा मागोवा घेत दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीला अटक केल्याचे पोलीस उपायुक्त संदीप आटोळे यांनी सांगितले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी ३७ दुचाकी, दोन ऑटो रिक्षा असा एकूण १५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. पोलीस आयुक्तांलय आणि आयुक्तालयाबाहेरील वाहनचोरीचे ३४ गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक दिगंबर अतिग्रे, पोलीस उपनिरीक्षक विनायक पाटील, पोलीस हवालदार बेंदरकर यांच्या पथकाने केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 02/12/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपळे सौदागर येथे 'हॉटेल रंगला पंजाब' खालील मजल्यावर आग

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रोडवरील 'हॉटेल रंगला पंजाब' रेस्टॉरंटच्या खालच्या मजल्यावर काल अचानक आग लागली. परिसरात धुराचे लोट दिसू लागताच नागरिकांनी घाबरून खबरदारी घेतली.

घटनेची माहिती मिळताच भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि युथ फाऊंडेशनचे कार्यकर्ते तातडीने घटनास्थळी पोहोचले. कार्यकर्त्यांनी त्वरित अग्निशामक दलाशी संपर्क साधून आग विझवण्याची मदत मागवली. काटे यांनी स्वतःही परिस्थितीचा आढावा घेत संबंधित यंत्रणांशी समन्वय साधला आणि आवश्यक ती तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. अग्निशामक दलाने घटनास्थळी पोहोचताच आग नियंत्रणात आणण्याचे काम सुरू केले. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे आग मोठ्या प्रमाणात पसरून गंभीर नुकसान होण्यापासून बचाव झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याबाबत तपास सुरू आहे. घटनास्थळावर लोकप्रतिनिधी म्हणून शत्रुघ्न काटे यांनी घेतलेली तातडीची खबरदारी आणि प्रशासनाचा जलद प्रतिसाद यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.



# प्रभाग 17 च्या विकासासाठी राहुल मदने निवडणुकीच्या "मैदानात"

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड - चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, बिजलीनगर,दळवीनगर गिरीराज या भागातील अरुंद रस्ते, उद्यान,क्रिडांगण इत्यादी नागरी समस्या सोडविण्यासाठी आगामी महानगरपलिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १७ मधून आम आदमी पक्षाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते राहुल मदने हे निवडणुकीसाठी सज्ज झाले असून प्रभागातील तरुण व महिलांचा त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे मदने यांनी समाज गर्जना प्रतिनिधि जवळ सांगितले.**



उमेदवारीबाबत अधिक माहिती देताना मदने म्हणाले की " मी एक सामान्य कार्यकर्ता असून प्रभाग क्रमांक १७ मधील समस्या बाबत पूर्ण माहिती आहे. या प्रभागात दाट लोकवस्ती असतानाही लहान मुलांना खेळण्यास साधे क्रिडांगण नाही, उद्यान नाही, स्वच्छतेच्या बाबतीत खूप मागासलेपणा आहे. आरोग्य सेवा मिळविण्यासाठी खूप लांब पायपीट करावी लागते. पिण्याच्या पाण्याची नेहमीचीच समस्या आहेत.

एका बाजूला श्रीमंत महापालिका म्हटले जाते आणि प्रभागात नागरी समस्या बाबत नेहमी ओरड असते.त्यामुळे येत्या महापालिकेच्या निवडणुकीत प्रभागातील नागरिक व तरुणांच्या पाठिंब्यावर मी स्वच्छ सरकार चालविणारे आम आदमी पार्टीचे अरविंद केजरीवाल यांच्या पक्षातर्फे निवडणूक लढवीत असून पक्षाने माझी उमेदवारी जाहीर ही केली आहे.सध्या मी आम आदमी पार्टी ओबीसी शहर आघाडी अध्यक्ष पदावर कार्यरत असून अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. अनेक प्रश्नाच्या मागणी साठी आंदोलने केली आहेत.स्वराज्य वाहन चालक मालक संघटनेच्या शहराध्यक्षपदी काम करत असताना ड्रायव्हर व वाहन मालकाचे अनेक प्रश्न सोडविले आहेत.

सध्या मल्हार आर्मी पुणे जिल्हाच्या अध्यक्षपदी कार्यरत असून अनेक समस्याना वाचा फोडली आहे.धन शक्ती विरुद्ध जन शक्ती अशी माझी लढाई दिसते मात्र सर्वसामान्य मतदारांच्या पाठिंब्यावर मी ही लढाई जिंकणार असल्याचे राहुल मदने यांनी सांगितले.

प्रभाग १७ मध्ये पक्षाची पहिली उमेदवारी जाहीर करण्यात आली.

# म.सा.प. पिंपरी चिंचवडचा साहित्य पुरस्कार सोहळा उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा आयोजित वार्षिक साहित्य पुरस्कार सोहळ्यात विविध विषयातील निवड झालेल्या महाराष्ट्रातील लेखक, कवींना ज्येष्ठ साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी आणि ज्येष्ठ साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे भाषा सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड चे अध्यक्ष राजन लाखे, उपाध्यक्ष डॉ. रजनी शेठ उपस्थित होते. कथा, कविता, ललित, कादंबरी, आणि बालसाहित्य अशा पाच विभागात पुरस्कारासाठी पुस्तके मागविण्यात आली होती. एकूण १५५ पुस्तके प्राप्त झाली. त्यापैकी परीक्षकांनी पुरस्कारासाठी वरील पाच विभागातून १९ साहित्यकृतींची निवड केली.अध्यक्ष डॉ. न. म. जोशी आणि गिरीश प्रभुणे यांनी पुरस्कार्थी लेखकांचे अभिनंदन करून भावी प्रभावी लेखनासाठी प्रबोधनात्मक गोष्टी सांगितल्या. परीक्षकां पैकी रजनी शेठ यांनी निवडीचे निकष सांगितले. पुरस्कार्थी डॉ. किरण कुलकर्णी आणि शहाजी कांबळे यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे यांनी प्रास्ताविकातून पुरस्काराची माहिती व भूमिका स्पष्ट केली, संजय जगताप यांनी किरण लाखे यांनी सूत्रसंचालन केले.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

सस्नेह निमंत्रण

वर्ष तिसरे

# मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड २०२५

METRO CITY ICON AWARD 2025

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

# पुरस्कार सोहळा २०२५

## शुभहस्ते

**मा.श्री.श्रीरंग आप्पा बारणे**
मावळ लोकसभा खासदार

**मा.रोहिणी ताई खडसे**
महिला प्रदेशाध्यक्ष : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

## प्रमुख उपस्तिथी

**मा.श्री.इरफानभाई सय्यद**
शिवसेना उपनेते

**मा.शैलाजा ताई मोरे**
मा.उपमहापौरपि.चिं.मनपा

**मा.प्रियांका ताई बारसे**
मा.नगरसेविका पि.चिं.मनपा

**मा.सरिता ताई साने**
संघटिका : पिं.चिं.शहर शिवसेना

**मा.श्री.संतोष बारणे**
प्रसिद्ध उद्योजक, पिंपरी चिंचवड

**मा.श्री.पैगंबर शेख**
सामाजिक कार्यकर्ते

दिनांक 07 डिसेंबर 2025 | वेळ सकाळी 11:00 वा.

स्थळ : ग.दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटेरियम) आकुर्डी पिं.चिं.शहर

आयोजक

# शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स